**क्रमांक : २२५३/१११६/सीआर-१६/२०२०/१८**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - <u>घोषणा</u> -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक १ मार्च**, २०२० रोजी झालेल्या **दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व) परीक्षा - २०२०** या स्पर्धा परीक्षेची '**विहित कायदेविषयक ज्ञान**' या विषयाची प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी उमेदवारांना अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्विकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती विहित नमुन्यात परीक्षा नियंत्रक व सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, **५$^{१/२}$, ७** व **८** वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दिनांक ११ मार्च, २०२०** पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या निवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३ मार्च, २०२०
ठिकाण : मुंबई

सह सचिव व परीक्षा नियंत्रक
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई